# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्र.६ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ (निकाल विभाग)

**कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड,**
**गडचिरोली–४४२६०५**

**दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०**
**ईमेल : coegondwana@gmail.com**

जा. क्र. गों. वि. प. वि. /184/24

दिनांक: १७/०१/२०२४

## परिपत्रक

**विषय :– विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या गुणवत्ता यादीतील आक्षेपावर सुनावणी.**

**संदर्भ :– विद्यापीठाचे अधिसुचना क्र. गो.वि./प.वि./१६/२०२४ दि. ०४/०१/२०२४**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, विभाग प्रमुख तथा विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाने दि. ०४/०१/२०२४ रोजी शैक्षणिक सत्र २०२२–२३ मधील विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी संदर्भांकीत अधि.क्र. गों.वि./प.वि./१६/२०२४ अन्वये प्रकाशित केलेली आहे. प्रकाशित केलेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीवर ज्या विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी अथवा त्यांचे प्रतिनिधींनी घेतलेल्या आक्षेपाचे निराकरण करण्याकरिता प्रत्यक्ष मुळ दस्तऐवजासह सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कक्षात उपस्थित राहावे. जे विद्यार्थी अनुपस्थित राहतील अशा विद्यार्थ्यांच्या आक्षेपावर त्यांचे अनुपस्थितीत सुनावणी घेण्यात येईल व दिलेला निर्णय अंतिम राहिल, याकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांना अथवा संबंधीतांना कुठलाही प्रवासभत्ता देय राहणार नाही याची सर्व संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी.

(दिनेश ज. नरोटे)
संचालक (प्र),
परीक्षा व मुल्मापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

प्रतिलिपी:– १) मा. कुलगुरू यांचे स्वीय सहा. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर.
२) मा. प्र–कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर
३) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सादर